# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Board of Extra Mural Studies & Senior Citizens Help Club**

**Savitribai Phule Pune University, Ganeshkhind, Pune 411007**

**Email :** bems@unipune.ac.in
**Tel.No. 020 - 25622997**
**Honorary Director**
**Dr. Harishchandra Govind Navale**

बहि:शाल शिक्षण मंडळ व
ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे ७

संदर्भ : बशिम/०३/२०२५
दिनांक : ०७/०१/२०२५

## परिपत्रक

प्रति,
मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ०७

**विषय: विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा आयोजनाबाबत......**

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधील सुप्त कलागुण विकसित व्हावेत, आणि त्यांच्या कल्पनेला वाव देण्याच्या दृष्टिने निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा या विभागामार्फत आयोजित करण्यात येणार आहेत. **स्पर्धकाला दोन्ही स्पर्धेत भाग घेता येईल.**

❖ **निबंधलेखन स्पर्धा विषय: १) कृत्रीम बुद्धीमत्तेचा मानवी जीवनावरील संभाव्य परिणाम**
**२) नैतिक व मुल्य शिक्षणाची गरज**
**३) महिला सक्षमीकरण**
**४) माझ्या जीवनात संविधानाचे महत्व**

❖ **चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा: – सदर स्पर्धेसाठी एक दिवस आधी विषय देण्यात येईल**
**( चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेसाठी प्रत्येक संघास वेळ १२ मिनिटे असेल )**

## स्पर्धेचे नियम व अटी

१) शिक्षकेतर सेवकांकडून निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धांसाठीची नावे **बुधवार दिनांक १५ जानेवारी २०२५** पर्यंत आपल्या विभागप्रमुखांच्या मार्फत लेखी स्वरूपात आमच्या विभागाकडे कळवावीत. ( विहित नमुना सोबत जोडला आहे.)

२) चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेसाठी एकूण ३ स्पर्धक, त्यापैकी एक संघप्रमुख असा संघ तयार करून, लेखी स्वरूपात विहित नमुन्यात माहिती भरून **बुधवार दिनांक १५ जानेवारी २०२५** पर्यंत आमच्या विभागाकडे कळवावीत. ( विहित नमुना सोबत जोडला आहे.)

३) **निबंधलेखन स्पर्धेसाठी** दिलेल्या चार विषयांपैकी काणत्याही एका विषयावर स्पर्धकांस प्रत्यक्ष लेखन करण्याकरिता **सोमवार दिनांक २०/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता पर्यावरणशास्त्र विभागाचे सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०७** या ठिकाणी उपस्थित राहावे.
निबंधलेखनासाठी **एक तास १५ मिनीटे वेळ दिला जाईल** व आवश्यक कोरे पेपर आमच्या विभागाकडून देण्यात येतील. **( निबंधलेखनाची वेळ सकाळी ११.०० ते १२.१५ असेल )**

४) **सोमवार दिनांक २०/०१/२०२५ रोजी दुपारी १२.१५ ते १.१५ या वेळेत** चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेचे विषय सोडत पद्धतीने जाहीर करण्यात येईल. यावेळी **संघप्रमुखांनी पर्यावरणशास्त्र विभागाचे सभागृह** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०७ या ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५) **चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा मंगळवार दिनांक २१/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००** या वेळेत विद्यापीठाचे **पर्यावरणशास्त्र विभागाचे सभागृह,** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०७ या ठिकाणी आयोजित करण्यात येईल. या ठिकाणी सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे.

६) सदरील निबंधलेखन स्पर्धेत **कमीत कमी १० स्पर्धकांनी** व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेसाठी **कमीत कमी १० संघ ( प्रत्येक संघात ३ प्रतिनिधी )** यांनी भाग घेतला तरच स्पर्धा आयोजित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

७) **दोनही स्पर्धांमध्ये परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील. तसेच निबंधलेखनाची प्रत मिळणार नाही.**

८) शासनमान्य पदावर कायमस्वरूपी कार्यरत असणारे शिक्षकेतर कर्मचारी व विद्यापीठ फंडातून घेतलेले शिक्षकेतर कर्मचारी यांना स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल. **( शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेतून नियुक्त झालेले शिक्षकेतर कर्मचारी यांना स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही. )**

**—: बक्षिसे :—**

| अ. क्र. | तपशील | निबंधलेखन स्पर्धा | चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा |
|---|---|---|---|
| १) | पहिले बक्षीस | रू. ५०००/— | रू. ६०००/— |
| २) | दुसरे बक्षीस | रू. ३०००/— | रू. ४०००/— |
| ३) | तिसरे बक्षीस | रू. २०००/— | रू. ३०००/— |
| ४) | उत्तेजनार्थ बक्षीस | रू. १,५००/— | रू. २०००/— |

या स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापनदिन समारंभावेळी बक्षिसे दिली जातील. स्पर्धकांनी निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेसाठी नावे विभागप्रमुखांमार्फत मानद संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ यांच्याकडे **बुधवार दिनांक १५ जानेवारी २०२५ पर्यंत सोबत जोडलेल्या नमुन्यांमध्ये भरून पाठवावीत.** या नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

डॉ. हरिश्चंद्र गोविंद नवले
मानद संचालक,
बहि:शाल शिक्षण मंडळ व
ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष

**टिप: - १) सर्व विभागप्रमुखांना विनंती की, सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास आणावे व स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रोत्साहीत करावे.**
**२) सोबत: निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेत भाग घेण्यासाठीचे अर्ज**

दिनांक ........................

प्रति,
मानद संचालक,
बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ०७

**विषय: निबंधलेखन स्पर्धेत भाग घेण्याबाबत.........**

महोदय,

मी खालील तपशीलाप्रमाणे सदर स्पर्धेत भाग घेत आहे.

| स्पर्धकाचे संपूर्ण नाव मराठी व इंग्रजी मध्ये ( दोन्ही भाषेत ) लिहीणे आवश्यक आहे | मोबाईल नंबर | विभाग | पदनाम व सेवक क्रमांक/प्रकल्प क्रमांक | निबंधाचा विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

............................................
( नाव:..................................................)
स्पर्धकांची स्वाक्षरी

..........................................
मा.विभागप्रमुख स्वाक्षरी व शिक्का

दिनांक ........................

प्रति,
मानद संचालक,
बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ०७

**विषय: चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेत भाग घेण्याबाबत.........**

महोदय,

आम्ही खालील तपशीलाप्रमाणे सदर स्पर्धेत भाग घेत असून खालील प्रमाणे संघ केला आहे.

| स्पर्धकांची संपूर्ण नावे मराठी व इंग्रजी मध्ये ( दोन्ही भाषेत ) लिहीणे आवश्यक आहे | मोबाईल नंबर | विभाग | पदनाम व सेवक क्रमांक/प्रकल्प क्रमांक | स्पर्धकाची स्वाक्षरी | विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का |
|---|---|---|---|---|---|
| संघप्रमुख<br>१) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |